# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः20.03.2026** **वारः शुक्रवार**

---

1. हिंदू नववर्षाच्या मुहूर्तावर काल अयोध्येत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंच्या हस्ते श्रीराम यंत्राची स्थापना
2. देशासह राज्यात हिंदू नववर्षाचा आनंदोत्सव
3. गेल्या तीन दिवसांत देशात साडेपाच हजाराहून अधिक ग्राहकांची पाईप गॅस जोडणीला पसंती.
4. जळगाव जिल्ह्यात 200 कोटी रुपयांच्या केळी क्लस्टर प्रकल्पाला मंजुरी मिळाल्याची केंद्रीय कृषीमंत्री शिवराज चौहान यांची घोषणा आणि
5. सातारा, भंडारा, जालन्यात मेघगर्जनेसह अवकाळी पावसाची हजेरी, काढणीला आलेल्या पिकांच्या नुकसानाची शक्यता.

**<u>श्रीरामयंत्र</u>**

गुढीपाडवा आणि हिंदू नववर्षाच्या मुहूर्तावर अयोध्येत काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वैदिक मंत्रोच्चाराच्या गजरात श्रीराम यंत्राची स्थापना करण्यात आली. राष्ट्रपतींनी काल या परिसरातल्या विविध मंदिरांमध्ये दर्शन घेतले. आपण एकाच भावनेनं देशासाठी प्रार्थना करतो आणि श्रीरामांची आराधना करतो अशा शब्दात त्यांनी यावेळी उपस्थितांना संबोधित केलं. या शुभप्रसंगी आपण सर्वांनीच देशाला सर्वोच्च वैश्विक शिखरावर पोहोचवण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे असं आवाहन त्यांनी केलं. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित होते. अयोध्येत स्थापन केलेले श्रीराम यंत्र कांची कामकोटी पीठाकडून प्रदान करण्यात आलं असून ते वैदिक गणित आणि भौमितिक रचनांवर आधारित आहे.

**<u>गुढीपाडवा</u>**

चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा काल राज्यात उत्साहात साजरा झाला. हिंदू कालगणनेनुसार, शक संवत 1948 या नव्या वर्षाला कालपासून सुरुवात झाली. राज्यात गुढ्या उभारून, रांगोळ्या, तोरण, साखरगाठ्या लावून हा सण उत्साहात साजरा झाला. चैत्र नवरात्रीलाही कालपासून प्रारंभ झाला तर, देशाच्या विविध भागात चैत्र शुक्लादि, उगादी, चेती चंद, नवरेह आणि साजिबू चेरोबा हे सण साजरे झाले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यपाल जिष्णु देव वर्मा, तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूरकरांसह गुढीपाडवा साजरा केला. शहरात श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट आयोजित शोभायात्रेत त्यांनी सहभाग घेतला. ठाण्यात कोपिनेश्वर मंदिरात पालखीची विधीवत पूजा करून नववर्ष स्वागत यात्रेला प्रारंभ झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेसह इतर मान्यवर हजर होते. कोल्हापूरात पारंपरिक पशुधनाची मिरवणूक तसेच शोभायात्रा काढण्यात आली. कोल्हापूरच्या अंबाबाईच्या दर्शनालाही मोठी गर्दी झाली होती. सांगलीत मराठी नववर्षानिमित्त आयोजित सूर पहाटेचे कार्यक्रमात पंडित भुवनेश कोमकली यांच्या गायन झाले. तर नाशिकमध्ये आयोजित नववर्ष स्वागत यात्रेत मैदानी खेळांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. धाराशिवमध्ये श्री तुळजाभवानी देवीच्या मंदिराच्या कळसावर पहाटे गुढी उभारण्यात आली. तर बुलडाणा जिल्ह्यातल्या खामगावमध्ये मिशन ओ टूच्या वतीनं जनुना तलाव परिसरात महिलांनी वृक्षारोपण करून नववर्षाची सुरुवात केली. अहिल्यानगर, धुळे, रत्नागिरी, आणि पुण्यात ढोल ताशांच्या वाद्याच्या गजरात आणि पारंपरिक पेहरावात शोभायात्रा काढण्यात आल्या. या शोभायात्रांमध्ये विविध विषयांवरचे चित्ररथही सामील झाले होते. तर अकोल्यात संस्कृती संवर्धन समितीने मोटरसायकल रॅलीचे आयोजन केले होते.

**दैनिक तरुण भारत**

विचारांचे संवर्धन आणि तरुणांपर्यंत त्या विचारांचा प्रसार या उद्देशाची पूर्ती तरुण भारत दैनिकाने निश्चितपणे केली असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर इथं काढले. नागपूरमध्ये आयोजित तरुण भारत दैनिकाच्या शताब्दीपूर्ती कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत, केंद्रीय रस्ते वाहातूक आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. विपरीत परिस्थितीतही दैनिकाने, विचार म्हणून आपले कार्य अविरत सुरू ठेवल्याचे सांगून, मुख्यमंत्री म्हणाले.....

**तरुण भारत अत्यंत महत्त्वाचं आहे की जीवनात वाचलेलं पहिलं वर्तमानपत्र म्हणजे तरुण भारत आहे. त्याच्यामुळे त्याचं महत्त्व हे कधीच या ठिकाणी कमी होऊ शकत नाही आणि शताब्दीपूर्ती याकरता देखील महत्त्वाची आहे, की कुठलंही त्या ठिकाणी राजकीय पाठ नसताना किंवा राजश्रयाविना ज्यावेळेस एखादी सामाजिक चळवळ ही शंभर वर्ष पूर्ण करते. त्यावेळी खऱ्या अर्थानं तिच्या पाठीमागचं जे वैचारिक अधिष्ठान असतं तेच त्या शंभर वर्षाच्या पूर्तीता त्या ठिकाणी कारणीभूत असतं.**

तरुण भारतने वैचारिक भूमिका कायम ठेवत राष्ट्रवादाचा विचार समाजापर्यंत पोचवल्याचे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. या प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ज्येष्ठ प्रचारकांच्या कार्याची नोंद घेणाऱ्या समर्पण या विशेषांकाचे तसंच अविरत या शताब्दीपूर्ती निमित्तच्या विशेष पुरवणीचे प्रकाशन करण्यात आलं.

**पाईप गॅस जोडण्या**

देशात गेल्या तीन दिवसांत साडेपाच हजाराहून अधिक ग्राहकांनी पाईप गॅस जोडणीला पसंती दिल्याची माहिती पेट्रोलियम आणि भूगर्भ वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी काल दिली. दिल्लीत आखाती प्रदेशातल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आयोजित आंतर-मंत्रालयीन बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. या बैठकीत शर्मा यांनी गेल्या दोन आठवड्यात सव्वा लाख घरगुती आणि व्यावसायिक वापरासाठीच्या पाईप गॅस जोडण्या वितरीत करण्यात आल्याचीही माहिती दिली. देशभरात घरगुती वापरासाठीचा पीएनजी आणि वाहतुकीच्या वापरासाठीचा सीएनजी दोन्ही वायूंचा 100 टक्के पुरवठा सुनिश्चित करण्यात आला असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**केळी क्लस्टर-जळगांव**

जळगाव जिल्ह्यासाठी 200 कोटी रुपयांच्या केळी क्लस्टर प्रकल्पाला मंजुरी मिळाल्याची घोषणा काल केंद्रीय कृषीमंत्री शिवराज चौहान यांनी केली. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात केळी उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद कार्यक्रमात त्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या, तसेच महत्वाच्या घोषणाही केल्या. केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असून शीतगृह साठवणूक, रायपनिंग चेंबर आणि आधुनिक साठवण सुविधांसाठी भरघोस अनुदान देण्यात येणार असल्याचे चौहान यांनी सांगितलं.

**साखर सहवीज निर्मिती**

राज्यातल्या 37 साखर कारखान्यांच्या सहवीजनिर्मिती प्रकल्पातून खरेदी केलल्या विजेचे 308 कोटी रुपयांचे वीजबिल महावितरणकडे थकीत आहे. ही रक्कम कारखान्यांना मिळावी यासाठी राज्य सरकारने आदेश द्यावेत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघानं केली आहे. सध्याचे सहवीजनिर्मितीचे दर प्रतियुनिट साडेचार रुपये ते 4 रुपये 99 पैसे आहेत. उद्योगांना ते न परवडणारे आहेत. तसंच शेतकऱ्यांची प्रलंबित वीज रक्कम वसूल करून दिली नाही तर पाच टक्के दर कपात करण्यात येते. त्यामुळं ही वसुली शक्य नसल्याचं संघानं स्पष्ट केले आहे.

**पोलिस वाहन-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग पोलिस दलासाठी अत्याधुनिक 28 वाहनांचं लोकार्पण काल पालकमंत्री नितेश राणे आणि गृहराज्यमंत्री डॉक्टर पंकज भोयर यांच्या हस्ते झालं. सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा असल्यानं नागरिकांबरोबरच पर्यटकांची सुरक्षा महत्त्वाची आहे.

त्यासाठी पोलिस दलाला साधन सुविधांनी सज्ज करण्यासाठी जिल्हा नियोजन निधीतून ही अत्याधुनिक वाहनं देण्यात आली आहेत.

**<u>सरस कामगिरी-पालघर</u>**

पालघर जिल्ह्यात विरारमध्ये आयोजित सरस महोत्सवात ग्रामीण महिला स्वयंसहायता गटांनी नवे विक्रम नोंदवले. 12 ते 16 मार्च या कालावधीत, महोत्सवात एक कोटी दहा लाख रुपयांची उलाढाल झाल्याची नोंद झाली आहे. उमेद उपक्रमांतर्गत पालघर जिल्हा परिषद आणि वसई-विरार महानगरपालिका यांच्या संयुक्त माध्यमातून ही विक्री झाली आहे.

**<u>अमेरिका शास्त्रज्ञ हिवरे बाजार-अहिल्यानगर</u>**

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या हिवरे बाजार इथं काल अमेरिकेच्या शास्त्रज्ञांनी भेट दिली. माजी सरपंच पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाखाली गावानं पाणलोट क्षेत्रातील कामाची पाहणी त्यांनी केली. या कामांमुळं भूजल पातळी वाढ, वनीकरण वाढ, जमीनीची धूप थांबल्यानं दुष्काळी गावाचं रूप पालटल्याची माहिती पवार यांनी पाहुण्यांना दिली.

**<u>महाराष्ट्र केसरी कुस्ती</u>**

पुण्यात सुरू असलेल्या 68 व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत कालच्या दिवसाचा समारोप अनेक चित्तथरारक लढतींनी झाला. रात्री उशिरा झालेल्या किताबी लढतीमध्ये माती विभागातील महेंद्र गायकवाड, बाळू बोडके, सिकंदर शेख, शुभम शिंदनाळे,संतोष दोरवड आणि सुदर्शन कोतकर यांनी विजय मिळवत धक्कादायक निकालाची नोंद केली. त्याचप्रमाणे गादी विभागातल्या पहिल्या फेरीत शिवराज राक्षे, पृथ्वीराज पाटील, हर्षवर्धन सदगीर आणि पृथ्वीराज मोहोळ यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत पुढच्या फेरीत प्रवेश केला.

**<u>पाऊस</u>**

राज्यात काल विविध जिल्ह्यांमध्ये पुन्हा एकदा अवकाळी पावसानं जोरदार हजेरी लावली. नाशिक आणि साताऱ्यात शहरी भागासह विविध जिल्ह्यात मेघगर्जनेसह पाऊस झाला. काही ठिकाणी गारपीटही झाली. तर अकोला आणि भंडारा जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. मक्याचं पीक जमीनदोस्त झाल्यानं शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. जालन्यातही बहुतांश भागात पावसानं हजेरी लावली. काढणीला आलेल्या गहू आणि हरभरा पिकाचं नुकसान होण्याची शक्यता आहे.

**<u>हवामान</u>**

हवामान विभागानं संपूर्ण राज्यात पावसाचा इशारा दिला असून विशेषतः अहिल्यानगर, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यात पावसाचा नारंगी बावटा फडकवला आहे. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी पावसाबरोबर प्रतितास 30 ते 40 किलोमीटर वेगानं वारे वाहतील असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.